संस्थापक - नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

रोखठोक बेधडक

संपादकीय.....

॥ न मे भक्त : प्रणश्यति ॥

# भारतीयांच्या दातृत्वाचा जागतिक गौरव

हेचि दान देगा देवा, तुझा विसर न व्हावा अशी मागणी करणारी इथली संस्कृती आणि संत परंपरा आहे.ज्ञानदेवांनी सगळ्या सृष्टीसाठीच पसायदान मागून सर्वांभूती परमेश्वर असल्याचे दाखवून दिले. विश्वाच्या कल्याणामध्ये आत्मकल्याणाचा मार्ग शोधणारी भारतीय संस्कृती या कारणासाठीच आज हजारो वर्षांनंतर टिकून आहे.आपल्याला मिळालेला मनुष्य जन्म हा केवळ व्यक्तिगत स्वार्थासाठी आणि उपभोगासाठी नाही तर तो त्यागासाठीसुध्दा आहे. हा संस्कार म्हणजे या संस्कृतीचा सर्वात मोठा अलंकार ठरतो.अलिकडेच चॅरिटी एड फाऊंडेशन या जागतिक पातळीवरच्या स्वयंसेवी संस्थेने जगातल्या १२३ देशांचे सर्वेक्षण केले आणि सर्वाधिक पैसा आणि वेळ याचे दान करणाऱ्यांमध्ये भारताचा पहिला क्रमांक असल्याचे आढळून आले. स्वयंस्फूर्तीने दुसऱ्यांच्या मदतीला धावून जाणे ही भारतीय माणसाची मूळ प्रवृत्ती आहे किंबहुना भारताच्या मातीचा तो सर्वात मोठा गुण आहे. ज्याला जग चॅरिटी म्हणतं त्याचा उगमच भारतातून झाला आहे. म्हणूनच तर पूर्वीच्या काळी भारतात सोन्याचा धूर निघत होता. आणि आज भारत हा गरीब देश म्हणून हिणवला जातो.आज देशामध्ये चाळीस टक्के लोक दारिद्र्य रेषेखाली राहतात. सरासरी तीस रुपये रोज ही त्यांची कमाई असते. सव्वाशे कोटींच्या या देशात साठ कोटी लोक अशा आर्थिक विवंचनेमध्ये जगतात. उरलेल्या साठ कोटींपैकी जवळपास पंचवीस कोटी लोक हे आपली आर्थिक स्थिती कशीही असली तरी स्वत:च्या कमाईतला पंचवीस टक्के भाग समाजासाठी दान करतात. आज जागतिक पातळीवरच्या एखाद्या स्वयंसेवी संस्थेच्या सर्वेक्षणात भारताच्या दातृत्वाचा उल्लेख होत असेल तर त्याचे सगळे श्रेय भारतीय संस्कृतीच्या संस्कारांमध्ये आहे हे नाकारता येणार नाही.या सर्वेक्षणामध्ये लोकसंख्येने मोठ्या असलेल्या चीनपेक्षाही भारतातले लोक हे दान करण्याच्याबाबतीत आघाडीवर असल्याचे दिसून येते.आणि गेल्यावर्षीच्या आकडेवारीप्रमाणे जवळपास अठरा कोटी पासष्ट लाख भारतीयांनी वेगवेगळ्या स्वयंसेवी संस्थांना वेगवेगळ्या माध्यमातून मदत केल्याचे दिसून आले. भारताच्या या दातृत्वाचा निर्देशांक जगाच्या आलेखामध्ये सर्वात उंच स्थानी आहे हीगोष्ट निश्चितच भारतीयांना अभिमानाची ठरते.

## दान आणि मनाचे समाधान

आज जगातल्या सर्व मोठ्या देशांमध्ये स्वयंस्फूर्तीने मदत देणाऱ्यांची संख्या वाढत आहे. अमेरिकेतले वॉरेन बफेट असतील किंवा बिल गेट्स असतील हे सध्या जगातले सर्वांत मोठे दानशूर उद्योगपती मानले जातात. त्यांनी कमावलेल्या एकूण संपत्तीच्या पंचवीस ते तीस टक्के भाग त्यांनी जगातल्या अनेक अविकसित देशांमधल्या सोयीसुविधांसाठी दान केला आहे. भारतातल्याही अनेक प्रकल्पांना बिल गेट्स यांच्या फाऊंडेशनने भरघोस मदत केली आहे. जागतिक पातळीवर ऑक्टोबर महिन्याचा पहिला आठवडा हा गिव्हिंग विक म्हणून पाळला जातो. वेगवेगळ्या स्वयंसेवी संस्थांना मदत करण्याचे आवाहन केले जाते आणि लोक उत्स्फूर्तपणे त्यामध्ये सहभागी होत असतात. भारतामध्येसुध्दा मोठमोठ्या कंपन्यांनी आपल्या नफ्यातला दोन टक्के भाग हा सामाजिक कार्यासाठी वापरला पाहिजे, अशी फायदेशीर सक्ती केली गेली आहे. खरे तर अशी सक्ती करण्याचे काहीच कारण नाही. कारण स्वत:च्या संपत्तीचा काही भाग समाजासाठी देणे किंवा एकूण मानवी मनाचा नीट अभ्यास केला तर दातृत्व ही एक प्रवृत्ती असल्याचे सहजपणे लक्षात येईल. ही वृत्ती असली पाहिजे. त्यासाठी सक्ती करणे खरे तर अनैसर्गिकच मानायला हवे. स्वयंस्फूर्तपणे जेव्हा मदतीचे हात पुढे येतात त्याचवेळेला त्या समाजाची संस्कृती काय आहे हे लक्षात येते. भारताचा प्राचीन काळ हा दातृत्वसंपन्नच होता.त्याचा आज अभ्यास केला जात नाही. या प्राचीन संस्कृतीचा आजच्या पिढीला नीट परिचय करून दिला जात नाही. तरीदेखील आजचा भारतीय समाज हा मनाचा मोठेपणा दाखवून जर अशा मदतीच्या कार्यामध्ये किंवा दातृत्वाच्या क्षेत्रामध्ये अग्रेसर राहतो. हे निश्चितच वैशिष्ट्यपूर्ण ठरते. कारण शेवटी दानाचा आणि मनाचा घनिष्ट संबंध असतो. ज्यामधून खरेखुरे समाधान मिळते. असे दानच मनाची श्रीमंती दाखवत असते. नुसती पैशाची श्रीमंती असून चालत नाही त्यासाठी मनाचा उदारपणाही तेवढाच आवश्यक ठरतो. गडगंज पैसा असूनही एका नव्या पैशाचेही दान  न करणारे अनेक महाभाग पहायला मिळतात. तर काहीवेळेला एकभिकारीसुध्दा दुसऱ्या भिकाऱ्याला मदत करत असल्याचे चित्र बघायला मिळते. म्हणूनच दातृत्व ही मनाची प्रवृत्ती आहे. ही जितकी प्रगल्भ होईल तितकी समाजाची सभ्यता वृध्दिंगत होत जाईल.

## भारतातली यज्ञ संस्कृती

आज ज्यावेळेला जागतिक पातळीवर भारताच्या या दातृत्वाचा गौरव होतो त्यावेळेला इथल्या प्राचीन संस्कृतीच्या अनेक वैशिष्ट्यांकडे लक्ष वेधले जाते. भारतीय संस्कृतीने असे मानले आहे की या सृष्टीतले जे काही आहे ते या सर्वशक्तीमान परमेश्वराचे आहे. ते आपले स्वत:चे नाही. म्हणून आपण जे काही मिळवतो त्याचा अधिकाधिक भाग हा पुन्हा इथेच खर्च केला पाहिजे .तो इथेच अर्पण केला पाहिजे. आणि ही प्रवृत्ती विकसित होण्याकरताच यज्ञसंस्कृती निर्माण केली गेली. यज्ञामध्ये टाकल्या जाणाऱ्या आहुती या सृष्टीच्या संपन्नतेसाठीच दिल्या जात होत्या. इदम न मम हे माझे नाही तुझेच आहे. इथपासून ते तेन त्यक्तेन भुंजिथा. म्हणजे आवश्यकता असेल तेवढ्याच गोष्टीचा उपभोग घेणे असे संस्कार या यज्ञसंस्कृतीने रुजवले. गरज असेल तेवढ्याच गोष्टींचा मनुष्याने उपयोग केला पाहिजे. या सृष्टीचे समाजाचे त्यागातून पोषण करण्याची अभिनव कल्पना मांडली गेली. कोणाचेही शोषण किंवा दोहन होता कामा नये. यालाच संस्कृती मानली गेली. स्वत:कडे असलेली भाकरी दुसऱ्याला देणे ही संस्कृती आणि आपल्याकडची कोणतीच वस्तू न देणे ही विकृती अशीच शिकवण इथे प्राचीन काळापासून दिली गेली आहे. या देशातली अध्यात्मिक परंपरा ही शरीरापेक्षाही आत्म्याचा विचार करणारी आहे मनुष्यच काय पण सर्व प्राणिमात्रांमध्ये ईश्वराचा अंश पाहणारी आहे. भूतमात्रांमध्ये दया, क्षमा, शांतीचा अनुभव घेणारी आहे म्हणूनच जर भारतीय लोक  दातृत्वामध्ये कर्तृत्ववान ठरत असतील तर ते इथल्या अध्यात्माची शिकवण पुढे नेत आहेत, असे म्हणायला हवे.